दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ५६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२७ मे २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# अनिल परब यांची ईडीकडून १२ तास चौकशी

## शासकीय निवासस्थानासह सात ठिकाणी टाकल्या होत्या धाडी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना नेते आणि मंत्री अनिल परब यांच्यावर मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी ईडीकडून गुन्हा दाखल झाला आहे. त्याचसोबत शासकीय निवासस्थानासह ७ ठिकाणी छापेमारी केली आहे. अनिल परब यांचे निकटवर्तीय असलेले ईडीच्या जाळ्यात अडकले आहेत. मुंबई, पुणे, रत्नागिरी याठिकाणी ईडीने छापेमारी केली आहे. त्यामुळे शिव-सेनेला मोठा धक्का बसला आहे. आज १२ तासांच्या चौकशीनंतर ईडीचे अधिकारी अनिल परब यांच्या निवासस्थानातून बाहेर पडले आहे.




परिवहन मंत्री अनिल परब यांच्या शासकीय निवासस्थानी पहाटे ईडीचे अधिकारी पोहचले होते. सीआरपीएफ जवानाच्या तुकड्याही त्यांच्यासोबत होत्या. वांद्रे येथील खासगी घरातही ईडीच्या अधिकाऱ्यांचे सर्च ऑपरेशन सुरु होतं. परब यांच्या संबंधित ७ ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. अनिल देशमुख प्रकरणाचे तपास अधिकारी शिवालय बंगल्यात पोहचले. ईडीच्या अधिकाऱ्यांकडून अनिल परब यांची तब्बल १२ तास चौकशी करण्यात आली. रत्नागिरीचे पालकमंत्री अनिल परब यांच्या दापोली तालुक्यातील मुरुड समुद्रकिनाऱ्यावरील साई रिसॉर्टवर ईडीच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकला

## कोणत्याही चौकशीला तयार, कारवाई सूडबुद्धीने : अनिल परब



राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांच्या घरावर ईडीने गुरुवारी छापेमारी केली. यावेळी ईडीच्या अधिकाऱ्यांनी जवळपास अनिल परब यांची १३ तास मॅरेथॉन चौकशी केली. ईडीच्या अधिकाऱ्यांनी चौकशीनंतर अनिल परब यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी दापोली येथील साई रिसॉर्ट चालू नसताना केंद्रीय पर्यावरण विभागाकडून खोटा गुन्हा दाखल केला गेला. आजची चौकशी फक्त रिसॉर्टविषयी होती. परंतु सूडबुद्धीने ही कारवाई सुरु होती, कोणत्याही चौकशीला सामोरे जायला तयार आहे, अशी प्रतिक्रिया अनिल परब यांनी दिली. आज ईडीच्या अधिकाऱ्यांनी माझ्या निवासस्थानावर तसेच माझ्याशी संबंधित काही लोकांवर छापे मारले. गेल्या काही दिवसांपासून या बातम्या सतत येत होत्या. ईडीची कारवाई होणार, अशा बातम्या सातत्याने कानावर पडत होत्या. यामागील गुन्हा तपासला असता असे लक्षात आले, दापोली येथील साई रिसॉर्ट, जे मी पहिल्या दिवसापासून सांगत आहेत, याचे मालक सदानंद कदम आहेत. याचा मालकी हक्क त्यांनी सांगितला आहे, असे अनिल परब म्हणाले. याबाबत कोर्टातही दावा केला आहे. सदानंद कदम यांनी खर्चाचे सर्व हिशोब आयकर विभागाला दिले, हे सगळे असताना हे रिसॉर्ट अजून पूर्ण झालेले नाही. असे असताना पर्यावरणाची दोन कलमे लावून या रिसॉर्टमधून सांडपाणी समुद्रात जाते, अशा प्रकारचा चुकीचा गुन्हा केंद्रीय पर्यावरण खात्याने दापोली पोलिसात दाखल केला आहे, असे अनिल परब यांनी सांगितले. याचबरोबर, जे रिसॉर्ट सुरुच नाही आहे, ज्याच्याबद्दल प्रदुषण महामंडळाने रिपोर्ट दिला आहे. तसेच, पोलिसांनी सुद्धा रिपोर्ट दिला आहे की रिसॉर्ट सुरू नाही. तरी देखील माझ्या नावाने, साई रिसॉर्टच्या नावाने नोटीस काढली गेली, तक्रार दाखल केली गेली. त्याला प्रेडिगेटेड ऑफेन्स समजून ईडीने माझ्यावर छापेमारीची कारवाई केली. ईडीच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास तयार असल्याचे अनिल परब म्हणाले.

बंद रिसॉर्टचे सांडपाणी समुद्रात कसे जाईल. या सर्व गोष्टींचा खुलासा कोर्टात होईल, चौकशीअंती सगळे सत्य समोर येईल. मी चौकशीला पुढे गेलो आहे आणि यापुढेही मी चौकशीला जाईल. मी प्रत्येक गोष्ट कायद्याला पुढे ठेवून बघतो, त्यामुळे मला माहीत आहे. कायद्यानुसार काय होऊ शकते, काय होऊ शकत नाही, त्यामागील काय अर्थ काढायचे ते वेळ आल्यावर पाहू. सर्व गोष्टींचा खुलासा कोर्टात देईल, असेही अनिल परब यांनी सांगितले.

# जंजिरा किल्ला पर्यटकांना बंद



**दै.रायगड नगरी । मुरुड**

पावसाळा जवळ आल्याने ढगाळ वातावरणासोबत समुद्रात वाढणाऱ्या लाटांच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांना कोणताही धोका पोहचू नये, यासाठी आजपासून पुरातत्व खात्याने जंजिरा किल्ला बंद करण्याची घोषणा केली आहे. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी प्रवेश द्वाराजवळ उतरताना प्रवाशांची होणारी कसरत लक्षात घेता सुरक्षिततेच्या कारणावरून हा निर्णय घेण्यात आला आहे.

जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी ५ लाखांपेक्षा अधिक पर्यटक येत असतात. पर्यटकांमुळेच येथील बोटचालक, लॉन्च मालकांचा उदरनिर्वाह होत असतो. गेल्या वर्षी कोरोनाकाळात जंजिरा किल्ला फार कमी कालावधीसाठी सुरु ठेवण्यात आला होता. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात किल्ला सुरु करण्यात आला होता. त्यामुळे स्थानिकांना रोजगारासाठी फारच अल्प व्यवसाय मिळाला होता.

परंतु आता पावसाळी हंगामासाठी जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात आला असून पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी हा निर्णय घेतला असल्याची माहिती पुरा-तत्व खात्याचे अधिकारी बजरंग ऐलीकर यांनी दिली आहे.

# सारथी संस्थेस खारघरमध्ये भुखंड उपलब्ध करुन देणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेस नियोजन विभागामार्फत नवी मुंबईतील खारघर सेक्टर ३७, मधील ३ हजार ५०० चौ.मी.क्षेत्रफळाचा भूखंड देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.


राज्य शासनाने मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी यांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी या संस्थेची स्थापना केलेली आहे. सारथी संस्थेमार्फत राज्यातील पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती व मुंबई येथे विभागीय कार्यालय, वसतिगृहे, अभ्यासिका व

.../२

# कर्जत तालुका 'पर्यटन तालुका' केल्यास रोजंदारीचा प्रश्न सुटेल

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत - खालापूर तालुक्यातील डॉक्टर, वकील व व्यापारी प्रतिनिधींशी सुसंवाद साधण्यासाठी एका विशेष बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत तालुका 'पर्यटन तालुका' केल्यास रोजंदारीसह अनेक प्रश्न मार्गी लागतील असे सूचित केले.



पोसरी येथील परामाऊंट रिसॉर्टच्या सेमिनार हॉल मध्ये विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी खासदार राजन विचारे, आमदार महेंद्र थोरवे, संपर्क प्रमुख बबन पाटील, सह संपर्क प्रमुख विजय पाटील, उप जिल्हाप्रमुख भाई गायकर व्यासपीठावर उपस्थित होते. विजय पाटील यांनी बैठकीचा उद्देश सांगितला.

खालापूरच्या वकिलांनी आम्हाला तहसील कार्यालय आणि भूमिअभिलेख कार्यालयातून सहकार्य मिळत नाही. असे सांगितले तर व्यापाऱ्यांनी खोप-ोली लोकल आल्या नंतर शहरात गर्दी होते त्यामुळे आमच्या व्यवसायावर परिणाम होतो. त्यासाठी लोकल येण्याच्या वेळवर दोन तीन पोलीस कर्मचारी असल्यास बऱ्याच अंशी प्रश्न सुटेल असे सांगितले.

सराफ असोसिएशनचे मोहन ओसवाल यांनी एखाद्या चोराने एखाद्या सोन्याचे दुकान दाखवल्यास त्याच्याकडून पोलीस खाते अव्वाच्या सव्वा सोने घेते. त्यामुळे व्यवसाय कसा करायचा? असा प्रश्न निर्माण होतो. याला आवर घालणे गरजेचे आहे. असे सांगून कर्जत रेल्वे स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्यांचे रद्द करण्यात आलेले थांबे पुन्हा सुरु करावेत तसेच बंद केलेल्या गाड्या सुरु करायात असे सूचित केले. 'भविष्यात चौक पर्यंत येणारी मेट्रो खोपोली पर्यंत आणावी तसेच नवी मुंबईची ए सी बस सेवा खोपोली साठी सुरु करावी. मात्र त्यासाठी डेपो मध्ये सीएनजी ची सुविधा उपलब्ध करावी लागेल म्हणजे ती बस सेवा सुरू होईल अशी सूचनाही काहींनी केली.

आमदार थोरवे यांनी 'कर्जत तालुका ग्रीन झोन आहे. सुमारे तीन हजार फार्म हाऊस तालुक्यात आहेत. हा तालुका 'पर्यटन तालुका' म्हणून जाहीर झाल्यास रोजंदारीसह अनेक प्रश्न मार्गी लागतील. असे सूचित केले. त्यावर पत्रकार विजय मांडे यांनी 'पर्यटन तालुका जाहीर केल्यास ढाक 'मिनी माथेरान' विकसित करा. ही मागणी गेली पंधरा वर्षे करीत आहे. ती मार्गी लागल्यास कर्जत तालुक्याचे अनेक प्रश्न सुटू शकतील व एक महत्वाचा तालुका म्हणून कर्जतकडे पाहिले जाईल अशी सूचना केली.

.../२

## संक्षिप्त...

### आक्सा बीचवर १२ जणांना वाचवण्यात यश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मालाड पश्चिम येथील डेंजरस बीच म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आक्सा बीचवर आज दुपारी ३ वाजून ५१ मिनिटांनी काही मुले सुमद्राला असलेली भरती आणि करंटमुळे गटांगळ्या खात बुडायला लागली. यावेळी येथे तैनात असलेले येथील दृष्टी लाईफ कंपनीचे सहा लाईफ गार्ड देवदूतासारखे धावून आले आणि त्यांनी या १२ मुलांना वाचवले. येथील लाईफ गार्डचे प्रमुख नथुराम सुर्यवंशी व भरत मानकर यांच्यासह उर्वरित चार जयेश कोळी प्रसाद बाजी, मयूर कोळी, आवेश पाटील या एकूण ६ दृष्टी लाईफ कंपनीच्या लाईफ गार्डच्या ही घटना नजरेस पडली. ते देवदूत म्हणून धावून आले आणि त्यांनी जीवाची बाजी मारत त्यांनी समुद्रात उडी घेतली. आणि त्यांनी १२ जणांना बुडतांना त्यांच्यावर झडप मारत बाहेर काढले. त्यापैकी तीन मुले पळून गेली. या वाचलेल्या मुलांना आम्ही त्यांचे वडील मोहसीन अब्दुल सत्तार शाह यांच्याकडे सुपूर्द केले अशी माहिती येथील अनुभवी लाईफ गार्ड नथुराम सुर्यवंशी यांनी लोकमतला दिली. लाईफ गार्ड्या या बहादूरी कामगिरीचे कौतूक होत आहे.आक्सा बीचवर १२ जून २००० साली मालाड पूर्व येथील १२ मुले येथे फुटबॉल खेळायला गेली होती. खोल पाण्यात बॉल काढण्यासाठी ही मुले साखळी करून आत गेली असता येथील समुद्राला असलेल्या जोरदार करंटी त्यांना आपल्या कवेत घेतले आणि ही मुले बुडाली होती. त्यावेळी त्यांचा शोध तब्बल दोन तीन दिवसांनी लागला. तीन दिवस मालाडवर शोक काळा पसरली आणि त्यांच्या घरात चूल पेटली नाही. सदर प्रतिनिधी या घटनेचा साक्षीदार होते.

# मोठ्या प्रमाणात तालुका पोलिसांनी केला दारूचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलिसांच्या वेगवेगळ्या पथकाने विविध ठिकाणी टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात देशी, गावठी हातभट्टी दारूचा साठा हस्तगत केला आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या विविध पथकाने तालुक्यातील केळवणे येथे छापा टाकून ४५० रुपये किमतीची विना परवाना बेकायदेशिरपणे जवळ बाळगलेली देशी दारु हस्तगत केली आहे. तर आजिवली येथील जय मल्हार हॉटेल जवळ टाकलेल्या छाप्यात २१०० रुपये किमतीची देशी दारू हस्तगत करण्यात आली आहे.

तसेच वरदोली येथे वाधवा व्हाइस सिटी लेबर कॉलनीच्या बाजूला असलेल्या पानटपरीमध्ये टाकलेल्या छाप्यात १९५० रुपये किमतीची देशी दारू हस्तगत करण्यात आली आहे तसेच सांगटोली टाकलेल्या छाप्यात १००० किमतीची गावठी दारू हस्तगत करण्यात आली आहे.

पनवेल तालुका पोलिसांनी टाकलेय वेगवेगळ्या ठिकाणच्या छाप्यामुळे बेकायदेशीर रित्या विना परवाना दारू विक्री रकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# 'घर तिथे शिवसैनिक' असे शिवसंपर्क अभियान राबवा : खा.राजन विचारे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील गावागावात शिवसेना पोहोचण्यासाठी यावेळी शिवसंपर्क अभियान असे राबवा की 'घर तिथे शिवसैनिक'असला पाहिजे. त्यासाठी आपआपसातील मतभेद पूर्णत: दूर करा, असे आवाहन खा.राजन विचारे यांनी केले.




यावेळी आमदार भरत गोगावले यांनी, थेट पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्यावर निशाणा साधून एकेरी उल्लेख करीत 'जर निधी आणला तर कुडपणला जाऊन नारळ न फोडताच परत का आली? ३१ मेरोजी कुडपणमध्ये पर्यटनमंत्री ना.आदित्य ठाकरे यांच्याहस्ते रस्ता, संरक्षण भिंत आणि काळकाई मंदिरापर्यंतच्या रस्त्याच्या कामाचे भुमिपूजन करणार असल्याचे यावेळी ठणकावून सांगताना आ.गोगावले यांनी २१ मे रोजी कुडपण येथे झालेल्या पालकमंत्री ना.आदिती तटकरे यांच्या दौऱ्याबाबत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केल्याने महाआघाडीतील बिघाडी रत्नागिरीनंतर रायगड जिल्ह्यात तीव्र असल्याचे उघड झाले आहे.

बुधवारी सकाळी पोलादपूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये शिवसंपर्क अभियानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपिठावर खा.राजन विचारे यांच्यासह आ.भरत गो-गावले, युवासेना दक्षिण रायगड विभागप्रमुख विकास गोगावले, जिल्हाप्रमुख अनिल नव-गणे, विधानसभा संपर्क प्रमुख सुभाष पवार, पोलादपूर संपर्क प्रमुख किशोर जाधव, माजी राजिप सदस्य प्रमोद घोसाळकर व चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख

.../२

# व्यावसायिक अविनाश भोसले यांना सीबीआयकडून अटक

**दै.रायगड नगरी । पुणे**

पुण्यातील व्यावसायिक अविनाश भोसले यांना सीबीआयने अटक केली आहे. अविनाश भोसले यांची यापूर्वी ईडी आणि सीबीआयने चौकशी केली होती. सीबीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार डीएचएफएल प्रकरणात अविनाश भोसले यांना अटक करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून सीबीआयकडून अविनाश भोसले यांचा शोध सुरु होता. ईडीनं यापूर्वी फेमा कायद्यांअंतर्गत अविनाश भोसले यांची चौकशी केली होती. सीबीआयनं गेल्या काही दिवसांपूर्वी भोसले यांच्या घरी छापे टाकले होते. अविनाश भोसले यांना अटक केल्यानंतर सीबीआय नेमकी काय कारवाई करणार येणाऱ्या काळात समोर येईल. ईडीनं गेल्यावर्षी अविनाश भोसले यांची संपत्ती जप्त केली होती. डीएचएफएल प्रकरणात सीबीआयकडून त्यांचा शोध घेण्यात आला होता.

अविनाश भोसले यांच्यावर ईडीनं गेल्यावर्षी कारवाई केली होती. अविनाश भोसले यांची

.../२

# 'भव्य सायक्लोथॉन' स्पर्धा नियोजन बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक पर्यावरण दिन आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त उलवा नोड मध्ये रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व उलवे सेना यांच्या संयुक्त विद्यमाने 'भव्य सायक्लोथॉन' स्पर्धा होणार असून त्या संदर्भातील नियोजन बैठक रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे सीईओ परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे पार पडली.

यावेळी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, युवा कार्यकर्ते किशोर पाटील, तसेच शेखर काशीद, सचिन आवटे, पल्लवी सुर्वे, सरोज मानवतकर, गुड्डू कनोजिया, अनिल सनस, अमित झा, विकी भिडे, मनोज सिंग, वंची सोम्सकंदन, ओमकार कदम, सरोज, फरहान, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे कार्यालयीन सरचिटणीस अनिल कोळी आदी उपस्थित होते.



# मॅजिकटॅक्सी उलटली नदी पात्रात, प्रवाशी बालबाल बचावले

**दै.रायगड नगरी । उरण**

गव्हाण फाटा रस्त्यावरुन चिरनेर गावाकडे जाणाऱ्या मॅजिकटॅक्सीने विधणे येथील रस्त्यावर पार्किंग करुन ठेवलेल्या मोटारसायकला जोरात धडक दिली. या झालेल्या अपघातात मॅजिकटॅक्सी व मोटारसायकल नदी पात्रात पडली आहे. सदर अपघातात मॅजिक टॅक्सी मधिल प्रवाशी जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे.

गव्हाण फाटा येथून प्रवाशी घेऊन चिर-नेर गावाकडे जाणाऱ्या मॅजिकटॅक्सीने विधणे येथील वळणदार रस्त्यावर पार्किंग करुन ठेवलेल्या मोटारसायकला जोरदार धडक दिली. या झालेल्या अपघातात भरधाव वेगातील मॅजिकटॅक्सी व मोटारसायकल विंधणे नदीच्या पात्रात पुलावरुन कोसळली आहे. सदर अपघ-तात मॅजिकटॅक्सी मधिल प्रवाशी जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे. या अपघाताचा आवाज ऐकून घटना स्थळावर प्रवाशी, नागरीकांनी एकच गर्दी केली. मॅजिक टॅक्सी मधिल प्रवाशी हे नदीच्या पात्रात उंच पुलावरुन पडून ही किरकोळ जखमी झाल्याने प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.



# चीन विरुद्ध चार...

जपानमध्ये नुकत्याच पार पडलेल्या 'क्वाड' परिषदेनंतर आशिया-प्रशांत क्षेत्रातील भारताच्या हितसंबंधांना नवे परिमाण लाभले आहे. अमेरिका, जपान व ऑस्ट्रेलिया या तीन बलशाली देशांसह भारत या प्रदेशातील आपले शांततामय सहअस्तित्व आणि जागतिक राजकारणाच्या पटावरील महत्त्व भविष्यात अबाधित ठेवू इच्छितो, असा स्पष्ट संदेश आपल्या देशाविरुद्ध कायमच कागाळ्या करणाऱ्या चीनसारख्या देशाला दिला गेला आहे, यात शंका नाही. भारताची वाढती अर्थव्यवस्था, आपली मोठी बाजारपेठ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रांत भारतीय देत असलेले योगदान यांमुळे जगातील कुठल्याच महत्त्वाच्या व्यासपीठावर भारताला डावलून चालणार नाही, याची जाणीव अमेरिकेला झाल्याचे दिसते. त्यामुळेच रशिया-युक्रेन युद्धात मॉस्कोबाबत भारताने घेतलेली 'तटस्थ' भूमिका आणि रशियाकडून सुरू ठेवलेली तेलखरेदी या बाबींना सुरुवातीला अमेरिका व युरोपने केलेला विरोध आता हळूहळू क्षीण होताना दिसतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात सगळ्यांच गोष्टी आपल्याला हव्या तशा होत नाहीत; वेळप्रसंगी लवचीक भूमिका घेणे हिताचे असते, याचे भान अमेरिकेच्या विद्यमान नेतृत्वाला असल्याचे दिसते. चीनचे वाढते वर्चस्व काबूत ठेवण्यासाठी समान आर्थिक, लष्करी व राजकीय हितसंबंध असणाऱ्या देशांना चुचकारून, त्यांच्या कलाने घेऊन एकत्र आणणे, यावर अमेरिकेने सध्या भर दिलेला दिसतो. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन हे नेमस्त प्रकृतीचे गृहस्थ आहेत. रशिया व युक्रेन युद्धात अमेरिकेने लष्करी हस्तक्षेप न करण्यामागे बायडेन यांच्या नेमस्त वृत्तीसोबतच इतरही घटक कारणीभूत आहेतच; मात्र रशियाइतकाच चीनचा उपद्रव अमेरिकेला सध्या सर्वाधिक सलतो आहे. त्यामुळे या परिषदेत चीनचे नाव एकदाही उघडपणे कुणी घेतले नसले, तरी तोच देश या चार देशांना एका व्यासपीठावर येण्यास भाग पाडत आहे, हे उघड आहे. खुद्द चीनने 'क्वाड'ची संभावना 'आशिया नाटो' अशी केली आणि अमेरिकेच्या तैवानबाबतच्या संभाव्य लष्करी हस्तक्षेपाची खिल्ली उडविली. 'क्वाड'ची संभावना चीनने समुद्रातल्या लाटांमुळे तयार होणाऱ्या फेसाशी केली आहे. असे असले, तरी 'क्वाड' देशांचे भविष्यातील एकत्र काम करणे त्या देशासाठी डोकेदुखी ठरणार आहे, हे निश्चित. 'क्वाड'ची कल्पना मुळात २००४मध्ये आलेल्या भयावह त्सुनामीनंतर या चार देशांनी एकत्रितपणे केलेल्या मदतकार्यातून आली होती; मात्र पुढे हा गट विखुरला. नंतर २००७ मध्ये जपानचे तत्कालीन पंतप्रधान शिंजो अॅबे यांच्या पुढाकाराने पुन्हा 'क्वाड'ची पुनःस्थापना करण्याचा एक प्रयत्न झाला. तो फारसा यशस्वी झाला नाही. ऑस्ट्रेलियाला चीनला दुखवायचे नव्हते, हे त्यामागचे प्रमुख कारण. अलीकडे ऑस्ट्रेलियाजवळच्या सॉलोमन बेटांवर आपला लष्करी तळ स्थापन करण्याच्या हालचाली चीनने सुरू केल्यानंतर, ऑस्ट्रेलियाला चीनच्या धोक्याची जाणीव झाली. 'क्वाड'ला अधिक जोर आला तो कोव्हिड साथरोगाच्या जागतिक संकटानंतर. या साथरोगाच्या जन्माशी चीनचा संबंध असल्याने आणि या रोगामुळे सर्वाधिक हानी अमेरिका व भारताची झाली असल्याने, चीनविरोधात एकत्र येण्याला चारही देशांना योग्य ते कारण मिळाले. चीनवर त्याचा किती परिणाम होतो, हे येणारा काळच सांगेल. या परिषदेत आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली, ती म्हणजे 'इंडो-पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क'ची स्थापना. यात अमेरिकेसह आशिया-प्रशांत क्षेत्रातील बारा देश सहभागी झाले आहेत. यात अर्थातच जपान, ऑस्ट्रेलिया व भारतासह न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, व्हिएतनाम, ब्रुनेई व फिलिपिन्स या देशांचा समावेश आहे. हे सर्वच देश या ना त्या कारणाने चीनमुळे त्रस्त आहेत. त्यामुळे त्यांना किमान आर्थिक आघाडीवर तरी एकत्र आणून अमेरिकेने भविष्यातल्या सहकार्याची पायाभरणी केली आहे. याशिवाय आशिया-प्रशांत क्षेत्रात सागरी गस्तीवर भर देण्याचा निर्धार या परिषदेत करण्यात आला; तसेच या परिसरात पायाभूत सुविधांसाठी सुमारे ५० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची घोषणाही करण्यात आली आहे. जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीस यांनी आपल्या पदाचा कार्यभार नुकताच हाती घेतला आहे. अल्बानीस तर आदल्याच दिवशी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान झाले आणि दुसऱ्या दिवशी या परिषदेला आले. असे असताना, बायडेन यांच्यासह पंतप्रधान मोदींवर या गटाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी आली आहे. मोदी यांच्या कार्यकाळात आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत भारत अधिक आक्रमक होताना दिसतो आहे. चीनला रोखण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय करण्याची इच्छाशक्ती त्यातून दिसून आली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला मान-सन्मान मिळत असला, तरी त्यातून अंतिमतः देशातील जनतेचे भले झाले, तरच त्याला काही तरी अर्थ प्राप्त होईल. त्या आघाडीवर भारतासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यासाठी देशांतर्गत मुत्सद्देगिरीला अजून बराच वाव आहे, हे नक्की!

# रायगड मधील एकमेव, संत जगनाडे महाराज मंदिराचा देखणा वर्धापनदिन सोहळा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

कोरोना संकट दोन वर्षाच्या प्रतिक्षेनंतर श्री संताजी जगनाडे महाराज मंदिर १३ वा वर्धापन दिन सोहळा रविवार दि. २२ मे २०२२ रोजी ऊसर बुद्रुक ता. माणगांव सारख्या दूर्गम सुंदर खेड्यातील तेली समाज बांधवाच्या वतिने संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे अध्यक्ष तथा दानशूर व्यक्तिमत्व डॉ.सतीश वैरागी यांनी तेली संघटन वाढवा असे सांगत श्री संताजी जगनाडे महाराज मंदिरासाठी पंचवीस हजार रुपये ची आर्थिक मदत केली असून उसर येथिल हे जिल्ह्या-तील एकमेव संत जगनाडे महाराजांच्या छोटेखानी मंदिराचे सुशोभिकरण करुन व संत जगनाडे महाराजांची मोठी मूर्ती प्रतिष्ठापित करुन आणखी प्रशस्त व्हावे ही इच्छा व्यक्त केली. समस्त तेली समाज बांधवांकडून त्यांचे आभार मानण्यात आले.

तसेच रायगड मधिल उसर मध्ये पहिल्यांदाच आलेले महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे कोषाध्यक्ष गजानन (नाना) शेलार, महासचिव भूषण कर्डिले यांनी आपली मनोगते व्यक्त केली. समाज एकत्र येणे काळाची गरज आहे तसेच ओबीसी आरक्षण सुद्धा गरजेचे आहे. यासाठी सर्व समाज बांधवांनी लढा देणे गरजेचे आहे. तसेच ज्याच्या बरोबर तेली तो भाग्यशाली जगात नंबर वन चा नेता व भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सुद्धा तेली असल्याचे अभिमानाने सांगत आम्ही किती भाग्यशाली आहोत हे समजण्या पलीकडचे आहे अशाप्रकारे तेली समाजाची मुलुख मैदानी तोफ गजानन भूषण कर्डिले यांनी समाज बांधवांना संबोधित केले. उसर येथे दिवसभर भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले होते सत्यनारायणाची महापुजा व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्री संताजी जगनाडे महाराज पादुका मिरवणूक पालखी सोहळा, पाहुण्यांचे स्वागत आणि सत्कार समारंभ, तसेच महिलांचा हळदी कुंकू समारंभ, ऊसर बुद्रुक ग्रामस्थ मंडळाने सुस्वर भजन सादर करीत आलेल्या प्रत्येकासाठी उसर ग्रामस्थांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

यावेळी समाजाचे कोकण विभाग अध्यक्ष गणेश धोत्रे, रायगड जिल्हाध्यक्ष गणेश महाडीक, कार्याध्यक्ष संतोष पोटे, युवा अध्यक्ष सिद्धांत शेलार, युवा सचिव प्रथमेश काळे, ठाणे येथिल प्रांतिकचे सुनिल चौधरी, पाली येथिल उद्योजक सुनील राऊत, माणगांव नगर पंचायतचे नगरसेवक तेली समाजाचे नेतृत्व अजित तार्लेकर, माणगांव-तळा तालुका अध्यक्ष रायगड भूषण रविंद्र कुवेसकर, प्रसिद्धी प्रमुख हरिश्चंद्र महाडिक, उपाध्यक्ष संतोष भोज, कोकण विभाग उपाध्यक्ष गजानन शेलार, रायगड जिल्हा कोकणस्थ तेली समाज अध्यक्ष संतोष रहाटे, सल्लागार विनायक तार्लेकर, पेण तालुका अध्यक्ष जितेंद्र लोखंडे, म्हसळा-श्रीवर्धन तालुका अध्यक्ष रवींद्र निगडे, महाड-पोलादपूर ता.अध्यक्ष किशोर किरवे तसेच श्री संताजी जगनाडे महाराज मंदिर कमिटी व सर्व तेलीसमाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# केरळ येथे झालेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेमध्ये उरणच्या हितेश भोईरची यशस्वी कामगिरी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणच्या हितेश भोईरने केरळ येथे झालेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेमध्ये वयक्तीक तीन सुवर्ण पदकांची कमाई करून, स्पर्धेवर आपली छाप उमटवली आहे. हितेशच्या यशाबद्दल राज्यभरातून त्याचे कौतुक करण्यात येत आहे.

तिरुअनंतपुरम मास्टर्स गेम असोसिएशन, केरळ यांच्यावतीने तिरुअनंतपुरम येथे नुकताच चौथी राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये देशभरातील कानाकोपर्यातून स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. तर उरणमधील हितेश भोईर याने या स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व केले होते. स्पर्धेमधील वर्चस्व राखण्यासाठी आलेल्या सर्वच स्पर्धकांनी खूप मेहनत घेतली होती. मात्र हितेशने मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर या स्पर्धेमध्ये ५० मी फ्रिस्टाईल, १०० मी फ्रिस्टाईल आणि ४००मी फ्रिस्टाईल या तीन जलतरण प्रकारांमध्ये वैयक्तिक तीन सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. तर ४-५० मी फ्रिस्टाईल रिले आणि ४-५० मी मिडले रिले या दोन सांघिक जलतरण प्रकारांमध्ये सिल्व्हर मेडल मिळवून दिले आहे.



हितेश भोईर हा उरणमधील नगरपालिकेच्या स्विमिंग पुलवर प्रशिक्षक म्हणून काम पहात आहे. आजवर त्याने अनेक स्पर्धांमधून आपली चमक दाखवली आहे. तर आपल्या अनुभवाचा आणि प्रशिक्षण हुशारीचा वापर करून, उरणमधील मुलांना जलतरण प्रशिक्षण देऊन, आपला वारसा पुढे नेण्यासाठी प्रेरणा देत आहे. तर त्याने घडवलेल्या स्पर्धकांनी पनवेल येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये उत्तम कामगिरी केली आहे. हितेशच्या यशाची बातमी कळताच त्याच्यावर राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# रिक्षा चालक रुपेश खांदेकर यांनी दिले तडफडणाऱ्या पक्षाला जीवदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्या उष्णतेचा चा तडखा माणसासोबत पक्षाला बसताना दिसून येत आहे. पावसाळा जवळ येत असल्याने तापमानात वाढ होत आहे,

नवीन पनवेल येथील सेक्टर १९ परिसरात वाढत्या तापमाना मुळे रस्त्यावर पक्षी तडफड करत पडला असता अनेक जण येणारे जाणारे बघ्याची भूमिका घेताना दिसत होते रिक्षा व्यवसाय करणारे रुपेश खादेकर यांना तडफडत असलेला पक्षी दिसल्या बरोबर जवळ जाऊन पक्षाला उचलून घेऊन पाणी पाजले थोडया वेळाने पक्षाची तडफड कमी झाल्यावर त्याला सुरक्षित ठिकाणी त्याला ठेऊन जीवदान दिल्याने रिक्षा चालक रुपेश खांदेकर यांचे विविध स्तरातून कौतुक होत आहे,

लहान पणा पासून पक्षी प्राणीची आवड असल्याने रिक्षा व्यवसाय करत असताना अनेक वेळ्या पक्षी विविध प्राणी उन्हाळ्यात रस्त्यावर पडलेले दिसले कि त्यांना पाणी पाजत सुरक्षित जागेवर ठेवत असतो असे प्रतिनिधी शी बोलताना रुपेश खांदेकर यांनी सांगिले



# पाले खुर्द, देवीचा पाडा व ढोंगऱ्याचा पाडा येथे विविध कामांचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल महापालिकेच्या नगरसेविका अरुणा किरण दाभणे यांच्या प्रयत्नांतून व सततच्या पाठपुराव्याने पाले खुर्द, देवीचा पाडा व ढोंगऱ्याचा पाडा या गावांमध्ये आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते विविध कामांचे उद्घाटन व लोकार्पण सोहळा पार पडला.

पाले खुर्द व देवीचा पाडा येथे लावलेल्या हायमास्ट पोलांचे लोकार्पण, गावदेवी तलावाभोवती बांधलेल्या संरक्षण भिंतीचे लोकार्पण, बौद्ध स्मशानभूमीचे सुशोभीकरण, पाले खुर्द गावातील रस्त्याचे डांबरीकरण व आरसीसी गटार बांधणे, वाचनालय बांधणे या कामांचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगरसेवक गणेश कडू, अरविंद म्हात्रे, नगरसेवक विष्णू जोशी, शंकर म्हात्रे, कामगार नेते प्रकाश म्हात्रे, आरडीसी बँकेचे संचालक गणपत देशेकर, किरण दाभणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# आरोग्य तपासणी व मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वसामान्यांचे आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा येत्या ०२ जूनला ७१ वा वाढदिवस आहे. त्या अनुषंगाने तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रमे आयोजित करण्यात आले असून न्हावेखाडी - उत्तर पाडा येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. या शिबिराचा परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी उत्तरपाडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत भव्य महा आरोय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरामध्ये तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून तपासणी तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीच्या च्या उपसरपंच मंजुषा ठाकूर, माजी उपसरपंच सागरशेठ ठाकूर, शिबीराचे संयोजक तथा भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते सी.एल. ठाकूर, माजी ग्रामपंचायत सदस्य अरुणशेठ ठाकूर, गोपिचंद ठाकूर, अनंत कडू, तुकाराम मोकल, प्रदिप मोकल, सतीश ठाकूर, सुजित ठाकूर, अनंथ ठाकूर, हिराजी ठाकूर, चंद्रकांत मोकल, प्रविण कालबागे, डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे डॉक्टर श्याम मोरे, यांच्यासह पदादिकारी, आणि डॉक्टर उपस्थित होते.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## सारथी संस्थेस खारघरमध्ये भुखंड उपलब्ध करुन देणार

ग्रंथालय, कौशल्य विकास केंद्र, सैन्य व पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण केंद्र, जेष्ठ नागरिक समुपदेशन कक्ष, महिला सक्षमीकरण केंद्र इ. सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांसाठी ५०० मुलांचे व ५०० मुलींचे स्वतंत्र निवासी वसतीगृह देखील विकसित करण्यात येईल.

याअंतर्गत नवी मुंबई येथील केंद्रासाठी सिडकोच्या माध्यमातून खारघर सेक्टर ३७, मधील ३५००.०० चौ.मी.क्षेत्रफळाचा हा भूखंड विशेष बाब म्हणून नाममात्र दराने भाडेपट्ट्याने शासनाच्या नियोजन विभागास देण्यात येणार आहे.

## कर्जत तालुका 'पर्यटन तालुका' केल्यास रोजंदारीचा प्रश्न सुटेल

नगरसेवक संकेत भासे यांनी 'प्रत्येक तालुक्याला क्रीडा संकुलासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल असा अध्यादेश आहे मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. ती झाल्यास तालुक्यातील खेळाडूंना त्याचा चांगला उपयोग होईल. हे निदर्शनात आणून दिले.

डॉ. हेमंत पाटील यांनी, आरोग्य विषयक विमा योजनांचा निधी खाजगी कंपन्यांकडून पंधरा दिवसात मिळतो मात्र शासकीय योजनांचा निधी सहा - सहा महिने झाले तरी मिळत नाही. त्यामुळे आम्हाला सेवा देण्यात खूप अडचणी येतात. त्याचा मार्ग काढावा. तसेच असंघटित कामगारांचा प्रश्नही सोडवावा. अशी मागणी केली. खासदार विचारे यांनी सर्वांच्या समस्या जाणून घेऊन त्या मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवून सकारात्मक मार्ग काढला जाईल.' असा शब्द दिला. यावेळी सुनील पाटील, ॲड. सनी ढाकवळ, डॉ. मिलिंद सोनावळे आदी उपस्थित होते.

## 'घर तिथे शिवसैनिक' असे शिवसंपर्क अभियान राबवा : खा.राजन विचारे

निलेश अहिरे आणि शहर शिवसेनेचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी खा.विचारे यांनी, सभागृहामध्ये विरोधकांना सळोकीपळो करून सोडणारे जे मोजकेच २५-३० आमदार होते त्यामध्ये आमच्यासोबत आ.गोगावले यांची भुमिका महत्वपूर्ण ठरत असे,अशी आठवण सांगून आ.गोगावले यांच्यामाध्यमातून गेल्या १५ वर्षांमध्ये जर एवढ्या मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत, तर या विकासकामांची माहिती जनतेत पोहोचवून तालुक्यातील ३५ नव्हे तर सर्व ४२ ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदेचे दोन तसेच पंचायत समितीचे चार असे सर्व सदस्य जिंकून १०० टक्के शिवसेना तालुक्यात असल्याचे दाखवून द्या, असे यावेळी सांगितले.

आ.भरत गोगावले यांनी पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये ग्रामीण भागातील शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणात साथ दिलेली असून आता पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या जागांसाठी शहरातील शिवसैनिकांनी नेटाने काम केल्यास तिथेही १०० टक्के यश मिळणार आहे. असा विश्वास व्यक्त करताना काम न करणाऱ्या नगरसेवकांचे तिकिट पुढील निवडणुकीमध्ये कट होणार, असा खणखणीत इशाराही यावेळी दिला. यावेळी आ. भरत गोगावले यांनी या मतदारसंघात केलेल्या विकास कामाची माहिती देत तालुक्यातील गावगावात विकास कामासाठी निधी ची कमतरता भासणार नसल्याचे सांगून तालुक्यातील सभागृह, रस्ते, नळपाणी योजना आदी सह विविध विकास कामे मार्गी लावल्याचे सांगत तालुका दुर्गम असला तरी शिवसेनेच्या पाठीशी ठाम उभा राहिल्याचे मत व्यक्त केले. जिल्ह्यात महाविकास आघाडीत काम करीत असताना साहेब अडचण निर्माण होत असल्याची व्यथा खासदार राजन विचारे यांच्यासमोर व्यक्त केली. आम्ही दुसऱ्याच्या बापाला आमचा बाप कधीच म्हणत नाही, असा टोला विरोधकांना लगावला.

पोलादपूर तालुक्यात गेल्या २१ मे रोजी पालकमंत्री तथा पर्यटन राज्यमंत्री ना.अदिती तटकरे यांच्या दौऱ्यानंतर शिवसंपर्क अभियानामध्ये आ.गोगावले यांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे ३१ मे रोजी पर्यटनमंत्री ना.आदित्य ठाकरे यांनी कुडपणमध्ये विकासकामांचा शुभारंभ पालकमंत्र्यांना वगळून केल्यास महाआघाडी सरकारमधील बिघाडी अधिकच तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## 'भव्य सायक्लोथॉन' स्पर्धा नियोजन बैठकव्यावसायिक अविनाश भोसले यांना सीबीआयकडून अटक

४० कोटींची संपत्ती गेल्यावर्षी जूनमध्ये जप्त करण्यात आली होती. अविनाश भोसले यांच्या व्यावसायिक भागीदारांवर देखील छापे टाकण्यात आले होते. डीएचएफएल येस बँक लोन प्रकरणी अविनाश भोसले यांच्यावर सीबीआयनं ही कारवाई केली आहे. सीबीआयनं अटकेची कारवाई करण्यापूर्वी ३० एप्रिल रोजी छापे टाकण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. अविनाश भोसले यांचे मित्र आणि व्यावसायिक भागीदार यांच्यावर देखील सीबीआयनं छापे टाकले होते. मुंबईतील मालाडमध्ये सीबीआयनं छापे टाकले होते, अशी माहिती आहे. सीबीआयनं ३० एप्रिलला ८ ठिकाणी छापे टाकले होते. अविनाश भोसले हे एबीआयल ग्रुपचे मालक आहेत.

# सुरक्षा व्यवस्थेत सहकार्य करणाऱ्या पोलिस पाटील आणि ग्रामसुरक्षा रक्षक दलाचा म्हसळा पोलिसांनी केला सन्मान

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

मुंबई लगत असलेल्या रायगड जिल्ह्यातील २५ तालुक्याची लोकसंख्या पाहता येथील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तालुका पोलिस ठाण्यातील पोलिसांची संख्या हि कितीतरी पटीने कमी आहे तशी ती म्हसळा तालुक्यातही अल्प असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेत पोलिसांना मदत म्हणुन गाव पोलिस पाटील आणि ग्राम सुरक्षा रक्षक दलाचा सहकार्य नक्कीच मोलाचा ठरत आहे.

म्हसळा पोलिस पाटील आणि ग्रामसुरक्षा रक्षक दल यांनी म्हसळा शहरात साजरे झालेले सन उत्सव विशेषतः श्री धावीर देव यात्रा व रमजान ईद वेळी म्हसळा पोलिसांच्या खांद्याला खांदा लावुन कामकाज पाहिले होते त्या अनुषंगाने म्हसळा पोलिसांनी त्यांचे कामाची दखल घेऊन पोलिस उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन प्रशांत स्वामी यांचे हस्ते म्हसळा तालुक्यातील सर्व पोलिस पाटील आणि ग्रामसुरक्षा दल सैनिक यांचा गुलाब पुष्प देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

म्हसळा पोलिस ठाण्याचे सहा.पोलिस निरीक्षक उद्धव सुर्वे यांनी आयोजीत केलेलल्या या सन्मान कार्यक्रमात पो.पा.संघटना अध्यक्ष अनंत पाटील, पो.पा.अशोक नाईक, निलेश लटके, सुरेंद्र विचारे, जगन्नाथ देवरुखकर, मनिषा मोरे, दिगंबर अंजारलेकर, विकास पोटले, स्नेहा पवार, रविंद्र पवार, लक्ष्मण गाणेकर, ग्राम सुरक्षा दलाचे जयदास कांबळे, नरेंद्र पदरत, शिंदे, गोविंद कांबळे आदि उपस्थित सहकाऱ्यांचा येथोचीत सन्मान करण्यात आला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## काशिद ग्रामपंचायतीत मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत व महाड येथील समृद्धी शिक्षण संस्था (पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत) यांच्या संयुक्त विद्यमाने बोर्ली–मांडला प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने आमचा गांधी आमचा विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायतीच्या सभागृहात मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

समृद्धी शिक्षण संस्था अध्यक्ष मयूरी शिंदे,सचीव अश–ोक डेरे, सायली सांगले, बोर्ली –मांडला प्राथमिक आरोग्य केंद्राचे सी.एच.ओ.डॉक्टर पांडुरंग बोहरी, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ विशेष करून महिला उपस्थित होत्या. यावेळी काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे चिकणी व काशिद गाव–ातील मुलांची व कुपोषित बालकांची रक्त गट, हिमोग्लोबिन, सॅम (ड.–.च.),मॅम (च.–.च.)आरोग्य तपासणी करण्यात आली.काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे चिकणी व काशिद गावातील मुलांनी या शिबिराचा लाभ घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत सरपंच नम्रता कासार, सदस्य, ग्रामसेवक, कर्मचारी वृंद तसेच महाड येथील समृद्धी शिक्षण संस्था,बोर्ली–मांडला प्राथमिक आरोग्य केंद्राचे सहकार्य लाभले.

## इनोव्हा व ट्रकच्या अपघातात दोन जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवेच्या मुंबई लेनवर आज पहाटे ५ च्या सुमारास इनोव्हा गाडी व अज्ञात ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

इनोव्हा गाडी क्रमांक टीएस ०८ जीएच ८४६९ हि घेऊन चालक एस करुणाकर हे मुंबई दिशेकडे जात असताना अज्ञात ट्रकने त्यांच्या गाडीच्या डाव्याबाजूला ठोकर मारून तो पसार झाला या अपघातात गाडीतील अंजीया तुमु (वय ४१, राहणार हैद्राबाद) व विजय मोहन वय ४५, राहणार हैद्राबाद) हे गंभीर जखमी झाले असून त्यांना एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आलेला आहे. या अपघातात गाडीचे सुद्धा नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

# कन्या शाळेच्या जागेवर तयार केलेल्या शाळेला हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय नाव देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्र. २ ला हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय असे जे नाव आहे तेच नाव पनवेल महानगरपालिके तर्फे कन्या शाळेच्या जागेवर तयार केलेल्या शाळेला देण्यात यावे अशी मागणी नामदेव शिंपी समाज युवक संघ तसेच अनेक सामाजिक संस्था व संघटनांनी केली आहे.

गोवा मुक्ती संग्रामात शहीद झालेले पन–वेलचे सुपुत्र हुतात्मा हिरवे गुरुजी यांचा आदर समस्त पनवेलकरांच्या मनात आहे. हु. हिरवे गुरुजी हे त्यावेळी अखिल भारतीय शिक्षक संघटनेचे चिटणीस होते व शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित जव–ाहरलाल नेहरू यांच्यासोबत चर्चा व वाटाघाटी करून शिक्षकांचे प्रश्न सोडवले होते. हु. हिरवे गुरुजी यांचे शैक्षणिक कार्य अलौकिक आहे. पनवेल हीच त्यांची कर्मभूमी होती. गोवा स्वातंत्र्य करण्यासाठी गोवा मुक्ती संग्रामात पनवेल मधून जे स्वातंत्र्य सैनिक गेले होते त्यांचे नेतृत्व हु. हिरवे गुरुजी यांनी केले होते. १५ ऑगस्ट १९५६ रोजी हु. हिरवे गुरुजी हे गोव्यातील तेरेखोल किल्यावर आंदोलन करताना शहीद झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करताना पनवेल नगरपरिषदेने रीतसर ठराव घेऊन पनवेल नगरपालिकेच्या शाळा क्रमांक २ ला हु. हिरवे गुरुजी यांचे नाव दिले होते व आजही त्यांच्याच नावाने सदरची शाळा कार्यरत आहे. पनवेल महापालिकेतर्फे कन्या शाळेच्या जागेवर नव्याने तयार केलेल्या दोन शाळांचे लवकरच नामकरण होणार आहे. आपल्या पनवेल शहरातील कन्या शाळेची इमारत जुनी झाल्याने ती पाडून त्या जागेवर नवीन इमारत उभारण्यात आली आहे. त्यामुळे आता या नव्या इमारतीत सरस्वती विद्या मंदिर, हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय आणि पूर्वीची कन्या शाळा अशा ३ शाळा एकत्रित करून भरण्यात येणार आहेत. पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्र. २ ला हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय असे जे नाव आहे तेच नाव पनवेल महानगरपालिके तर्फे कन्या शाळेच्या जागेवर नव्याने तयार केलेल्या शाळेला देण्यात यावे जेणे करून यापूर्वी जे विद्यार्थी हु. हिरवे गुरुजी विद्यालयात शिकत होते आणि ते शाळा सोडल्याचा दाखला घेवून शाळा सोडून गेले आहेत त्यांना भविष्यात तांत्रिक अडचण येवू नये तसेच सदर शाळेला हु. हिरवे गुरुजी यांचे नाव दिल्यास यापुढेही त्यांच्या स्मृती समस्त पनवेलकरांच्या मनात अशाच जागृत राहतील आणि पनवेल महानगरपालिके तर्फे हु. हिरवे गुरुजी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केल्यासारखे होईल.

पनवेल महानगरपालिके तर्फे बांधण्यात आलेल्या शाळेला हुतात्मा हिरवे गुरुजी विद्यालय हे नाव देण्यात यावे हि मागणी नामदेव शिंपी समाज युवक संघासह, राष्ट्रीय ओबीसी महासंघ, स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटना पनवेल, राष्ट्रीय जनसेना पार्टी, नामदेव शिंपी समाज युवक संघ उद्योग मार्गदर्शक मंडळ, हुतात्मा हिरवे गुरुजी समाजभुषण पुरस्कार समिती, रायगड शिंपी समाज महासंघ, पावनखिंड युवा मंच, राजाई महिला मंडळ मलकापूर, अखिल भारतीय नामदेव क्षत्रीय महासंघ नवी दिल्ली कोकण विभाग आदी अनेक सामाजिक संस्था व विविध संघटना व पनवेल भागांतील सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे.

## तळा पंचशील विकास संस्थेच्यावतीने गरीब गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप व गुण गौरव सोहळा सपंन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

रविवार दि २२मे २२ किरणशेठ देशमुख सभागृह येथे बौध्द समाजातील मुलांना नोकरी व्यवसाय नसलेल्या बांधवाच्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करुन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ई.पहिली ते दहावी विद्यार्थासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३१व्या जयंतीचे औचित्य साधून संस्थेच्यावतीने अध्यक्ष मा. एन के. जगताप यांच्या अध्यक्षते खाली अतिशय स्तुत्य आणी प्रेरणार्थक उपक्रम प्रथमच हाती घेण्यात आला.

याचाच शुभारंभ म्हणून याची सुरुवात करण्यात आली. महामानवाच्या प्रतिमेस वंदन करुन उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन सदर कार्यक्रम सुरु झाला याच अनुषगांने कोरोनाच्या कठिण काळात सुद्धा महिला बचत गटाच्यावतीने ९५ सभासद बनवून समाजातील भगिनींना अर्थिक सहाय्याने उभे रहाण्याची शक्ती दिली. तसेच दिड लाखाची पुंजी ऊभी केली याबद्द्ल त्यांचे सुद्धा कौतुक करण्यात आले. तसेच पुढिल वाटचालीस चालना देण्यात आली.

सदर कार्यक्रमास तालुक्यातील अनेक क्षेत्रातील मान्यवर तसेच ग्रामस्थ मान्यवर महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख मान्यवर म्हणून तळा नगर पंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष विजय तांबे, प्रोफेसर भिमेश भेकरे, ॲड प्रबुद्ध माळी, प्रकाश नात्ते तसेच संस्थेचे पदाधिकारी, महिला भगिनी उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे उपस्थित समाज बंधुभगिनींना व विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन लाभले सदर कार्यक्रमात कु.तन्वी गवाणे रहाटाड, कु करिना मोरे –मेढा ईत्यादी मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले..

सदर कार्यक्रम सपंन्न करण्यात साठी, भागुराम भेकरे., जाधव, मोरे, नात्ते, गायकवाड तसेच महिला भगिनी यांनी अतिशय मोलाच सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संस्थेचे सचिव अशोक गायकवाड यांनी करुन सर्वांना उपकृत केले.



## रोहा न्यायालयातील न्यायाधीश एस.डी. कमळाकर यांना निरोप व शुभेच्छा



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रोहा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील न्यायाधीश एस.डी. कमळाकर यांची चंद्रपूर येथे बदली झाल्याने रोहा बार असोसिएशन तर्फे मंगळवारी (दि.२५) रोहा न्यायालयात झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात न्यायाधीश एस.डी. कमळाकर यांना निरोप देऊन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाला रोहा बार असोसिएशनचे अध्यक्ष विधिज्ञ ॲड. नानासाहेब देशमुख, सचिव ॲड. एम.डी.पाटील, ॲड. आर.बी. सावंत, सुनील सानप, ॲड. मनोजकुमार शिंदे, ॲड. डी.डी. धारप, ॲड. महेश घायले, ॲड. एस. ए. हाफिज, ॲड. दिनेश वर्मा, ॲड. समीर सानप, ॲड. दिपक सोलंकी, ॲड. अजित दांडेकर, ॲड. प्रवीण दाभाडे, ॲड. महेश पवार, ॲड. संदीप भोसले, ॲड. ओमकार शिलधनकर, ॲड. मयुरा मोरे, ॲड. देवयानी मोरे, ॲड. पल्लवी जोशी, ॲड. फाल्गुनी ठक्कर, ॲड. भाग्यश्री मोरे, ॲड. तेजस्वीनी देशमुख, ॲड. श्रुतिका पवार आदींसह वकील वर्ग उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. मनोजकुमार शिंदे यांनी केले. तर विधिज्ञ आर.बी. सावंत, सुनील सानप, दिपक सोलंकी, मयुरा मोरे, पल्लवी जोशी आदिंनी न्यायाधीश एस.डी. कमळाकर यांच्याबद्दल आपले मनोगत व्यक्त करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी न्यायाधीश एस.डी. कमलाकर यांनी रोहा न्यायालयातील आपल्या आठवणी सांगून येथील वकील वर्गाने आपल्याला चांगल्या प्रकारे सहकार्य केल्याचे आवर्जून सांगितले.

# चंद्रकांत सुतार यांच्या प्रयत्नांने इंदिरा गांधी नगरात गॅस टाक्याच्या त्रासातून नागरिकांची सुटका

**दै.रायगड नगरी । माथेरान**

इंदिरा गांधी नगरातील नागरिकांना नेहमीच गॅस सिलेंडर साठी दिवसभर ताटकळत उभे राहावे लागत होते. याकामी गॅस ग्राहकांना विश्वासात घेऊन त्यांचा वेळ खर्च होऊ नये यासाठी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सुतार यांनी गॅस डिलर यांच्याशी संपर्क साधून वेळेत गॅस सिलेंडर मिळावेत आणि सर्व नागरिकांना सोयीस्कर पडतील जेणेकरून वाहतुकीचा खर्च सुध्दा कमी होईल या संदर्भात चर्चा केल्यानंतर आता गॅस सिलेंडर इंदिरा गांधी नगरातील प्रवेशद्वार येथे उतरवल्या जात आहेत.

चंद्रकांत सुतार यांनी सर्व ग्राहकांचे सिलेंडर साठी लागणारे आणि वाहतुकीचे पैसे घेऊन घरपोच सेवा दि.२५ मे पासून उपलब्ध करून दिली आहे त्यामुळे या भागातील नागरिकांचा वेळ वाया जात नाही.

सर्वांना घरपोच सेवा उपलब्ध झाल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे.यासाठी चंद्रकांत सुतार यांना महेंद्र जाबरे यांनी मोलाची साथ दिली आहे.

गॅस टाकी सेवा घरपोच देण्याचे नियोजन पावसाळा येण्या अगोदर पासून योग्य रित्या केल्याने गॅस टाकी साठी होणारा त्रास कमी झाला आहे या सर्व गोष्टी साठी मागील अनेक दिवसांपासून गॅस टाकी कर्मचारी बरोबर बोलणे करून योग्य दरात घर पोच गॅस टाकी आणून दिल्या बद्दल पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सुतार यांचे इंदिरा गांधी नगरचे रहिवासी रमाकांत तोरणे, रितू, पुष्पा कदम, सुरेश शिंदे, स्वप्नील गोसावी यांनी आभार मानले आहेत.




### जाहीर नोटीस

**उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**

On Admission

आरटीएस अपिल क्र..../२०२२

१) श्री.हरिश्चंद्र मंगळ्या म्हात्रे
२) श्री.लक्ष्मण मंगळ्या म्हात्रे
३) श्री.हासुराम मंगळ्या म्हात्रे, सर्व रा.आवरे, ता.उरण — अपिलार्थी

विरुद्ध

१) पोशा मंगळ्या म्हात्रे, रा.आवरे, ता.उरण, जि.रायगड
२) तलाठी सजा आवरे, ता.उरण, जि.रायगड
३) मंडळ अधिकारी कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : आवरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील फेरफार नोंद क्र.१९५८ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.१६/०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यंनी तसेच वरील जममीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आवरे, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १८३ | ९ | ०.१२.० | ०.२५ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यनिशी दिली.
ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/०५/२०२२

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकतीचे मालक श्री.प्रकाश राघोबा भगत, रा.घर क्र.३१ क, पनवेल शिवकर रोड, घरकूल जवळ, उसर्ली खुर्द, पोस्ट : ओएनजीसी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचेकडून आमचे अशिल मे.एच.आर.बिल्टेक बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोपरायटर मो.हनीफ याकुब सैय्यद आणि मो.रिझवान मो.सलीम हाजते, रा.सदनिका क्र.३०२, दिशा एन्क्लेव्ह, सेक्टर २३, नेरुळ, सीवूड, नवी मुंबई यांनी बांधकाम (विकसन) करण्यासाठी ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| गांव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| उसर्ली खुर्द | १९/१/ब/२ | ००–२०–०० पैकी (००–०५–००) | २.०४ |

तरी वरील मिळकतीबाबत होणाऱ्या बांधकाम (विकसनासाठी) कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लीज, लीएन सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिट अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणारे यांचेकडे प्रथमदर्शनी दाखल कराव्यात.

वरील विहित मुदतीत कोणचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/०५/२०२२

**सही/–**
**ॲड.दिनानाथ के. सोनकर**
**शॉप नं.१६, कल्पवृक्ष को.ऑप.हौ.सो.,**
**प्लॉट नं.४, सेक्टर ४, सेक्टर ९,**
**खांदा कॉलनी, पिन कोड–४१०२०६**
**मो. ९७६८९७४१५६**



मा.गोडसे मॅडम कोर्ट

ॲड.अनिरुद्ध गो. तुळसणकर, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.७२९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०७/२०२२

१) श्रीमती.सुमन अनिल दिघे
वय : ८२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बी.५, हर्षनिती बिल्डींग, प्लॉट नं.११२/३, रॉयल कॉस्मो हेल्थ क्लब जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
सध्या रा.फ्लॅट नं.१०६/१०७, साई स्पर्श बिल्डींग, साई मंदिर समोर, अंबानी हॉस्पिटल जवळ, लोधिवली ता.खालापूर, जि.रायगड
२) श्री.अतुल अनिल दिघे
वय : ५८ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.फ्लॅट नं.२०६/२०७, साई स्पर्श बिल्डींग, अंबानी हॉस्पिटलजवळ, लोधिवली, ता.खालापूर, जि.रायगड
३) श्री.अमोल अनिल दिघे
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.२०७/ए–२५, हॅपी व्हॅली, टीकुजीनी वाडीजवळ, मानपाडा, ठाणे (प.) ४००६१०
४) श्रीमती.अश्विनी आशुतोष दिघे
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
५) कुमारी श्रावणी आशुतोष दिघे
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
६) कुमारी पूर्वा आशुतोष दिघे
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
क्र.४ स्वतःकरिता व क्र.६ चे अज्ञान पालन करणार आई म्हणून
क्रं.४ ते ६ रा.फ्लॅट नं.१०६/१०७, साई स्पर्श बिल्डींग, साई मंदिर समोर, अंबानी हॉस्पिटल जवळ, लोधिवली ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२, ३ आणि ४ ते ६ यांचे पुर्वगामी कै.आशुतोष यांचे वडील कै.अनिल भालचंद्र दिघे यांचे दि.३१/१०/२०१८ रोजी देहावसान झाले आाहे. कै.अनिल भालचंद्र दिघे यांचा मुलगा कै.आशुतोष अनिल दिघे यांचे निधन नानावटी हॉस्पिटल, मुंबई येथे दि.१६/०५/२०२१ रोजी झाले आहे. कै.अनिल भालचंद्र दिघे यांची आई कै.सुमती भालचंद्र दिघे यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार क्र.१ ते ६ हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.अनिल भालचंद्र दिघे यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील अंतिम भूखंड क्रं.२०१/२ बी, वर बांधण्यात आलेल्या न्यू साई कृपा पनवेल को.ऑप.हौ.सोसायटी लि. या इमारतीचे दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रं.२०३, क्षेत्र ४००.७४ चौरस फुट (३७.२३ चौ.मी.) कारपेट + ३४.७७ चौ.फूट (३.२३ चौ.मी.) कारपेट कपबर्ड + १३६.३८ चौ.फूट (१२.६७ चौ.मी.) बाल्कनी एकूण क्षेत्र ५७१.८९ चौ.फूट (५३.१३ चौ.मी.) कारपेट अशा वर्णनाची निवासी सदनिका.**

वर श्रीमती.सुमन अनिल दिघे वगैरे हे कै.अनिल भालचंद्र दिघे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य तया हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.सुमन अनिल दिघे वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.अनिल भालचंद्र दिघे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२६/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे मॅडम कोर्ट

ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.७६५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०७/२०२२

१) श्रीमती.सुशिला मोहन तिवारी
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.मल्लेश मोहन तिवारी
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.नितेश मोहन तिवारी
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
४) कु.कल्पना मोहन तिवारी
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.रुम नं.४०३, प्लॉट नं.१४, से.१६, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ४ हे कै.मोहन आशाराम तिवारी यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील कै.मोहन आशाराम तिवारी हे दि.११/१०/२०२० रोजी मौजे : वेदांत हॉस्पिटल, ठाणे येथे मयत झाले आहेत. तसेच कै.मोहन आशाराम तिवारी यांची आई कै.कैलासदेवी आशाराम तिवारी ह्या दि.२८/१२/१९८४ रोजी मौजे : रुम नं.१९, अे चाळ, ग्राऊंड फ्लोअर, पायलट बंदर रोड, कुलाबा, मुंबई येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार नं.१ ते ४ हेच कै.मोहन आशाराम तिवारी यांचे वारसदार आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ४ यांच्याशिवाय कै.मोहन आशाराम तिवारी यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

कै.मोहन आशाराम तिवारी यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या सदनिका / शॉप मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**

| अ.क्र. | मौजे | मालमत्तेचे वर्णन | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | शॉप क्र.१०८, पहिला मजला, महालक्ष्मी मॉल, से.३५, प्लॉट नं.८, ८ बी | कारपेट क्षेत्र ४५ चौ.फूट, ४.१८ चौ.मी. |
| २ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.४०३, चौथा मजला, सी विंग, आर.बी. कॉम्प्लेक्स, से.१६ प्लॉट नं.१४ | बिल्टअप क्षेत्र २७३ चौ.फुट, कारपेट क्षेत्र ३२७.६ चौ.फुट |

**मिळकतीचे वर्णन (ब)**
**मौजे : चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.मोहन आशाराम तिवारी व कु.कल्पना मोहन तिवारी यांचे स्वकष्टार्जित व सामाईक मालकीच्या तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : चिंध्रण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाच्या सदनिका मिळकत आहे.

| मौजे | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड | सदनिका क्र.२०४, दुसरा मजला, सी विंग, बिल्डींग नं.६, कोणार्क मिडोस | कारपेट क्षेत्र १८.०१७ चौ.मी. बाल्कनी क्षेत्र ५.९४२ चौ.मी. |

कै.मोहन आशाराम तिवारी यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.मोहन आशाराम तिवारी यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसद–ाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २६/०५/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

